**भारत–जॉर्डन व्यावसायिक परिषदेला पंतप्रधान आणि जॉर्डनचे माननीय राजे अब्दुल्ला द्वितीय यांचे संबोधन (डिसेंबर 16, 2025)**

16 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि जॉर्डनचे माननीय राजे अब्दुल्ला द्वितीय यांनी आज अम्मान येथे आयोजित भारत–जॉर्डन व्यावसायिक परिषदेला संबोधित केले. या परिषदेला माननीय युवराज हुसेन तसेच जॉर्डनचे व्यापार व उद्योग मंत्री आणि गुंतवणूक मंत्री यांनीही उपस्थिती लावली. राजे आणि पंतप्रधान यांनी दोन्ही देशांमधील व्यावसायिक संबंध अधिक सशक्त करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि उभय देशांमधील उद्योग क्षेत्राच्या नेतृत्वाला विद्यमान क्षमता व संधींना ठोस विकास व दीर्घकालीन समृद्धीमध्ये रूपांतरित करण्याचे आवाहन केले. जॉर्डनचे मुक्त व्यापार करार आणि भारताची आर्थिक ताकद एकत्र येऊन दक्षिण आशिया, पश्चिम आशिया आणि त्यापुढील क्षेत्रांना जोडणारा एक आर्थिक कॉरिडॉर निर्माण करू शकतात, असे माननीय राजे यांनी नमूद केले.

2. परिषदेला संबोधित करताना पंतप्रधानांनी सांगितले की, जॉर्डन आणि भारत यांच्यातील समकालीन भागीदारी उत्साही आणि फलदायी आहे,जी दोन्ही देशांच्या मजबूत सभ्यतागत संबंधांवर आधारित आहे. पंतप्रधानांनी माननीय राजे यांच्या नेतृत्वाखाली जॉर्डनने बाजारपेठा व प्रदेशांना जोडणारा दुवा म्हणून आपली भूमिका प्रभावीपणे निभावली असून व्यवसाय आणि विकासाला चालना मिळवून दिली आहे, याचे कौतुक केले. पंतप्रधानांनी पुढील 5 वर्षांत जॉर्डन सोबतचा द्विपक्षीय व्यापार US$ 5 अब्जांपर्यंत दुप्पट करण्याचा प्रस्ताव मांडला. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरण्याच्या मार्गावर असलेल्या, सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताची कामगिरी अधोरेखित करत, पंतप्रधानांनी सांगितले की भारत जॉर्डनमधील तसेच जगभरातील भागीदारांसाठी व्यापक व्यावसायिक संधी उपलब्ध करून देत आहे. त्यांनी जॉर्डनमधील कंपन्यांना भारतासोबत भागीदारी करून 1.4अब्ज ग्राहकांच्या बाजारपेठेचा, मजबूत उत्पादनाधाराचा तसेच स्थिर, पारदर्शक आणि अंदाजयोग्य धोरणात्मक वातावरणाचा लाभ घेण्याचे आमंत्रण दिले. पंतप्रधानांनी नमूद केले की, दोन्ही देश एकत्र येऊन जागतिक पुरवठा साखळीतील विश्वासार्ह भागीदार बनू शकतात. भारतीय अर्थव्यवस्थेच्या 8% पेक्षा जास्त वाढीचा संदर्भ देत त्यांनी अधोरेखित केले की, ही यशस्वी वाढ उत्पादकतेवर आधारित प्रशासन आणि नवोपक्रम-संचालित धोरणांचा परिणाम आहे.

3. पंतप्रधानांनी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, फिनटेक, आरोग्य-तंत्रज्ञान आणि कृषी-तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भारत–जॉर्डन व्यावसायिक सहकार्याच्या संधी अधोरेखित केल्या आणि या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांतील स्टार्ट-अप्सना परस्पर सहकार्य करण्याचे आवाहन केले. फार्मा आणि वैद्यकीय उपकरणे या क्षेत्रांतील भारताची क्षमता आणि जॉर्डनचा भौगोलिक लाभ परस्पर पूरक ठरून, पश्चिम आशिया आणि आफ्रिकेसाठी जॉर्डनला या क्षेत्रांतील विश्वासार्ह केंद्र म्हणून विकसित करू शकतात, असे त्यांनी नमूद केले. कृषी, कोल्ड चेन, फूड पार्क, खते, पायाभूत सुविधा, वाहन उद्योग, हरित गमनशीलता तसेच वारसा व सांस्कृतिक पर्यटन या क्षेत्रांतील व्यावसायिक संधींवर त्यांनी

प्रकाश टाकला. भारताच्या हरित उपक्रमांबाबत बोलताना, नवीकरणीय ऊर्जा, हरित क्षेत्राला वित्तपुरवठा, विक्षारण आणि जल पुनर्वापर या क्षेत्रांमध्ये भारत–जॉर्डन व्यावसायिक सहकार्य वाढविण्याची सूचना पंतप्रधानांनी केली. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल [लिंक].

4. या परिषदेमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, फार्मा, खते, कृषी, नवीकरणीय ऊर्जा, वस्त्रोद्योग, लॉजिस्टिक्स, वाहन उद्योग, ऊर्जा, संरक्षण आणि उत्पादन या क्षेत्रांतील दोन्ही देशांतील व्यापार क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींचा सहभाग होता. शिष्टमंडळामध्ये FICCI आणि जॉर्डन चेंबर ऑफ कॉमर्स यांचे प्रतिनिधीही सहभागी होते, जे दोन्ही देशांमधील व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठी आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या सामंजस्य करार (MoU) अंतर्गत काम करत आहेत.

अम्मान

16 डिसेंबर 2025